सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
डॉ. संतोष परचुरे
संचालक


संदर्भ क्र. विविमं/२०२२–२३/५३५ दिनांक : १२/०४/२०२३

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील संबंधित शैक्षणिक विभाग, पुणे.

**विषय : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम आराखडा तयार करून कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत...**

**संदर्भ : जयंती–२०२३/मवि–१/४५७८ दि. १२ एप्रिल २०२३ चे पत्र**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठया उत्साहात साजरी केली जाते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीयांचे प्रेरणास्थान आहे. त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि आधुनिक भारत घडविण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाची समाजाला व विशेषत: शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थी आणि शिक्षकांना प्रेरणा मिळावी यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे जसे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याशी संबंधित विषयावर परिसंवाद, त्यांच्या विचारधारांवर आधारित ग्रंथोत्सव, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आदी नावीन्यपूर्ण उपक्रम/कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. याबाबतचे परिपत्रक आपल्या अवलोकनार्थ व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

शासन निर्देशानुसार आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागांमध्ये आपणामार्फत आयोजित कार्यक्रमाचा अहवाल (www.Unipune.ac.in – students development – bsd online – college login- for college users – login-main menu – students development – menu – gov/institute joint scheme proposal report – other joint scheme proposal report – create new application – योजना निवडा – “**डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त कार्यक्रम आराखडा व अहवाल**”) येथे ऑनलाईन पध्दतीने प्राधान्याने भरण्याबाबत संबंधितांना सूचित करावे.

आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागांमध्ये शासन निर्देशानुसार कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी. विद्यार्थी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, संबंधित शैक्षणिक विभाग यासह आपले महाविद्यालय/परिसंस्थातील उर्वरित शैक्षणिक तथा सह शैक्षणिक विभाग, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सामूहिक सहभागातून कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत संबंधितांना सूचित करावे. कळावे ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे

डॉ. संतोष परचुरे
संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ


भ्रमणध्वनी : ०९२७२७२७९९९, ०८२७५५१५३५४, ईमेल : sdparchure@gmail.com, bsd@unipune.ac.in
कार्यालय: ०२०–२५६२२६८०, ०२०–२५६२२६८७, संकेतस्थळ : http://www.unipune.ac.in/bsd

महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)

मध्यवर्ती इमारत, पुणे स्टेशन, पुणे - ४११ ००१

Phone No. ०२०-२६१२२११९ Web : www.dhepune.gov.in Email : director.dhepune@nic.in

जा.क्र. जयंती-२०२३/मवि-१/ ४५७८ दिनांक : १२.०४.२०२३ 12 APR 2023

**परिपत्रक**

**विषय : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सर्व अकृषी विद्यापीठे / महाविद्यालयांनी कार्यक्रम आराखडा तयार करुन कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत.**

संदर्भ : शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण -१११९/प्र.क्र.११५/१५/समन्वय, दिनांक २२.१२.२०१५

उपरोक्त विषयांकित प्रकरणी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. भारतीय लोकशाही व्यवस्थेची पायाभरणीबरोबर त्यांनी सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मौलिक असे योगदान भारतीय समाजाला दिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीयांचे प्रेरणास्थान आहे. त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि आधुनिक भारत घडविण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाची समाजाला व विशेषत: शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थी आणि शिक्षकांना प्रेरणा मिळावी यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे जसे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याशी संबंधित विषयावर परिसंवाद, त्यांच्या विचारधारांवर आधारित ग्रंथोत्सव, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आदी नावीन्यपूर्ण उपक्रम / कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

विद्यापीठ, महाविद्यालये यांनी आयोजित केलेल्या उपक्रमांना स्थानिक वर्तमानपत्रात पुरेशा प्रमाणात प्रसिध्दी देण्यात यावी तसेच अनुपालन अहवाल विभागीय सहसंचालक कार्यालयामार्फत संचालनालयास सादर करण्यात यावा.

**(डॉ. प्रकाश बच्छाव)**
सहसंचालक,
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति -

१. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य
३. प्राचार्य/संचालक, सर्व शासकीय/अशासकीय महाविद्यालये/ संस्था,.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२